MHLA090002542026

## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.९१/२०२६ मध्ये निशाणी क्र.१ खालील आदेश

(राजश्री शंकर पारसेवार वि. निरंक)

१. अर्जदाराने स्वतःच्या व इतर वारसांच्या नावे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मंजूर होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदाराचे संक्षिप्त कथन असे की, अर्जदार नामे राजश्री शंकर पारसेवार यांचे पती नामे शंकर दामोधर पारसेवार यांचे दि.३१.१०.२०२५ रोजी कलबुर्गी, राज्य कर्नाटक येथे निधन झालेले आहे. अर्जदाराचे असेही कथन आहे की, मयताच्या आई–वडिलांचे यापूर्वीच निधन झालेले आहे. अर्जदाराचे असेही कथन आहे की, मयताच्या पश्चात सदर मयतास अर्जदाराव्यतिरिक्त १ मुलगा नामे चैतन्य शंकर पारसेवार हे देखील कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदाराचे असेही कथन की, उपरोक्त नमूद वारसांशिवाय मयत शंकर दामोधर पारसेवार यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

३. अर्जदाराचे विशिष्ट कथन असे की, उपरोक्त मयताच्या मृत्यु पश्चात विविध शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी अर्जदारास मयत शंकर दामोधर पारसेवार यांच्या वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरिता अर्जदार या संबंधित कार्यालयामध्ये गेल्या असता त्यांना सक्षम न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र आणण्याचे सूचित करण्यात आले. सबब, प्रस्तुत अर्ज.

४. अर्जदाराने अर्जातील कथनांच्या सत्यतेसाठी स्वतःचे साक्षीपुराव्याचे शपथपत्र नि.क्र.११ वर दाखल करून अर्जातील मजकुराचा पूनःउल्लेख केला आहे. तसेच उपरोक्त मागणी केल्याप्रमाणे म्हणजेच मयत शंकर दामोधर पारसेवार यांच्या वारसांच्या नावे प्रस्तुत अर्ज मंजूर होण्याबाबत शपथेवर कथन केलेले आहे. अर्जदाराने नि.क्र.१२ सोबत मयत शंकर दामोधर पारसेवार यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत, अर्जदार व इतर वारसांच्या आधार कार्डच्या प्रती व वारसांबाबतचे स्वयंघोषणा पत्र इ. दस्त अभिलेखावर दाखल करून नि.क्र.१३ वरील पूरसीस अन्वये त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

५. अर्जदाराने अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र दै. 'यशवंत' या दिनांक १४.०२.२०२६ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द केले. मात्र मूदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

६. उपरोक्त कागदपत्रांच्या अनुषंगाने व अर्जदाराच्या साक्षीपुराव्यावरून असे स्पष्ट

होते की, शंकर दामोधर पारसेवार हे अर्जदाराने अर्जात नमूद केलेल्या तारखेस मयत झालेले आहेत; तसेच त्यांनी मृत्यूपत्र केलेले नाही. असे देखील स्पष्ट होते की, जाहीर प्रगटन दिल्यानंतर मूदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदाराने त्या आणि उपरोक्त परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद इतर १ व्यक्ती हे मयत शंकर दामोधर पारसेवार यांचे वारसदार असल्याचे शपथेवर कथन केलेले आहे. येथे असे नमूद करणे आवश्यक आहे की, साक्षीदाराने उपरोक्त सर्व बाबी शपथेवर कथन केलेल्या आहेत, त्यामुळे त्यांच्या कथनांवर अविश्वास दाखविण्यासारखी कोणतीही परिस्थिती न्यायालयासमोर नाही. तसेच प्रस्तुत अर्ज हा अर्जदाराने मयत शंकर दामोधर पारसेवार यांचे वारसदार असल्याचे केवळ औपचारिकपणे मान्य करण्याकरिता दाखल केल्यामुळे अर्जदाराची गरज लक्षात घेवून त्यांना तसे औपचारिकपणे वारस मान्य करणे गरजेचे आहे. यातील मयताचे निधन जरी या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राबाहेर झालेले असले तरी देखील अर्जदारास या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रामधील कार्यालयांत दाखल करण्यासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याची बाब विचारात घेऊन अर्जदार व परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद इतर १ व्यक्ती हे मयत शंकर दामोधर पारसेवार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देणे योग्य व न्यायाचे होईल. अंततः खालील आदेश पारीत करण्यात येत आहे:

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उपरोक्त परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केलेले अर्जदार आणि इतर १ वारसदार हे मयत शंकर दामोधर पारसेवार यांचे कायदेशीर वारस आहेत, असे औपचारिकपणे मान्य करण्यात येते.

३. उपरोक्त परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केलेले अर्जदार आणि इतर १ वारसदार हे मयत शंकर दामोधर पारसेवार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे विहित नमुन्यातील वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) हे अर्जदाराने आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.

४. मुंबई नियमन ८, १८२७ चे कलम ७ प्रमाणे तसेच दिवाणी नियमावलीचा परिच्छेद क्र.३१२ प्रमाणे प्रस्तुत प्रमाणपत्रावर तशी टीप नमूद करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE
Date: 2026.03.23 16:09:27 +0530

दिनांक : २३.०३.२०२६ (भालचंद्र रा. झेंडे)

ठिकाण : उदगीर. ३ रे सह–दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), उदगीर.